**"Tech-वारी २.०"- प्रशिक्षण कार्यक्रमासाठी येणाऱ्या केंद्र शासकीय अधिकाऱ्यांना "राज्य अतिथी" घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३६/प्रशि-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३० एप्रिल, २०२६

## परिपत्रक

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची तोंडओळख करुन देणे व महाराष्ट्रास Techno Savvy करण्याच्या दृष्टीने राज्यात दि.०५ ते ०९ मे, २०२५ या कालावधीत Tech Learning Week (TECH- वारी ) या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शासकीय सेवेत अधिक प्रभावीपणे करणे यासाठी गत वर्षाच्या TECH- वारी या प्रशिक्षण कार्यक्रमाचे विस्तारीत स्वरुप म्हणून राज्यामध्ये दि.०४ ते ०८ मे, २०२६ या कालावधीत Tech Learning Week (TECH- वारी २.०) या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यास मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञान, आरोग्य, मानसिक स्वास्थ्य इत्यादी विषयांचा समावेश असेल.

२. "Tech-वारी २.०" या कार्यक्रमामध्ये केंद्र शासनातील **श्रीमती एस. राधा चौहान, अध्यक्ष, क्षमता विकास आयोग (CBC)** या **दि.०४.०५.२०२६** रोजी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे सदर कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यास राज्य शासनास मदत होणार आहे. सदर बाब विचारात घेता, श्रीमती एस. राधा चौहान यांना दि.०३.०५.२०२६ व ०४.०५.२०२६ या कालावधीसाठी "राज्य अतिथी" म्हणुन घोषित करण्यात येत आहे.

३. श्रीमती एस. राधा चौहान यांना राज्य अतिथी घोषित करण्याबाबत तसेच त्यांना राजशिष्टाचार सुविधा (आगमन व निर्गमन प्रसंगी स्वागताची व्यवस्था, वाहन व्यवस्था, निवास व्यवस्था) देण्याबाबत राजशिष्टाचार विभागाने कार्यवाही करावी.

४. तसेच त्यांच्या राजशिष्टाचार सुविधेसाठी होणारा खर्च सामान्य प्रशासन विभागांतर्गत "मागणी क्र. ए-४, २०७०-इतर प्रशासकीय सेवा ०० - ००३ - प्रशिक्षण ०० - १० - राज्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी विविध सुविधा व सहाय यावरील खर्च (२०७० ०८५३) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात येईल.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०४३०१४४५०९९३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NEETA EKNATH SHINDE

Digitally signed by NEETA EKNATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F2BFFD6992498E56663024368C72B33364CFB066D53682C53A425E54D187A7C1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F325D659F47933958AA2D98F394DB95F94BE57548776492BA36E77EA1C4AA53B, cn=NEETA EKNATH SHINDE
Date: 2026.04.30 14:46:03 +05'30'

**(निता शिंदे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
२. अपर मुख्य सचिव ( सेवा ), यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
३. अपर मुख्य सचिव ( राजशिष्टाचार ), यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
४. निवड नस्ती/प्रशि-४.